www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

| प्रश्नपत्रिका क्र. | 507863 |
|---|---|

कोड : १०१

परीक्षा दिनांक : १५/१२/२०१३

वेळ : सकाळी १०.३० ते दुपारी १.००

माध्यम : मराठी

महाराष्ट्र राज्य शिक्षक पात्रता परीक्षा
(MAHATET)
पेपर I (इ. १ली ते इ. ५वी)

बैठक क्रमांक

| एकूण गुण | १५० |
|---|---|

| एकूण पृष्ठे | २४ |
|---|---|

## प्रश्नपत्रिका सोडविण्यापूर्वी कृपया खालील सूचना काळजीपूर्वक वाचा.

**सूचना :**

१) प्रश्नपत्रिकेमध्ये सलग एकूण १५० प्रश्न असून ते सोडविण्यासाठी उमेदवारास अडीच तास वेळ देण्यात आलेला आहे. प्रत्येक प्रश्नास एक गुण आहे. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

२) प्रत्येक प्रश्न वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असून प्रश्नाच्या खाली उत्तराचे पर्याय दिलेले आहेत. उत्तर नोंदविताना चार पर्यायांपैकी बरोबर उत्तर असलेल्या पर्याय क्रमांकाच्या वर्तुळाला काळ्या/निळ्या शाईच्या बॉलपेनने पूर्णपणे रंगवून उत्तर देणे आवश्यक आहे. अर्धवट रंगवलेले वर्तुळ, खाडाखोड अथवा एकाच प्रश्नासाठी दोन उत्तरे दर्शविलेली असतील अशा उत्तरांना गुण दिले जाणार नाहीत. पेन्सिलीने नोंदविलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.

**प्रश्नपत्रिकेमध्ये खालीलप्रमाणे विषयनिहाय प्रश्न आहेत.**

| | | | माध्यम |
|---|---|---|---|
| • भाग - A : भाषा १ व २ | - प्रश्न-क्रमांक १ ते ६० | - ६० गुण | इंग्रजी, मराठी |
| • भाग - B : बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र | - प्रश्न-क्रमांक ६१ ते ९० | - ३० गुण | मराठी |
| • भाग - C : गणित | - प्रश्न-क्रमांक ९१ ते १२० | - ३० गुण | मराठी |
| • भाग - D : परिसर अभ्यास | - प्रश्न-क्रमांक १२१ ते १५० | - ३० गुण | मराठी |

३) एकदा दिलेले उत्तर बदलता येणार नाही.

४) प्रत्यक्ष परीक्षा झाल्यानंतर एक आठवड्याचे आत संभाव्य उत्तरसूची जाहिर करण्यात येईल. प्रश्नपत्रिकेमधील प्रश्नांबाबत प्राप्त आक्षेपांनुसार कोणत्याही कारणामुळे प्रश्न (प्रश्न व पर्यायी उत्तरे) चुकीचे आहेत असे आढळल्यास व परिषदेच्या तज्ञ समितीने ते मान्य केल्यास ते प्रश्न रद्द करुन उर्वरित प्रश्नांच्या गुणांवर आधारीत तज्ञ समितीने निश्चित केलेल्या सूत्रानुसार अचूक प्रश्नांनुसार पात्रता जाहिर करण्यात येईल.

५) परीक्षार्थीने आपला बैठक क्रमांक त्यांना पुरविलेल्या प्रश्नपत्रिकेवर नोंदवावा.

६) प्रश्नपत्रिकेत कोणत्याही प्रश्नांच्या उत्तराची नोंद करू नये, उत्तरपत्रिकेचा, प्रश्नपत्रिकेचा कोणताही भाग वेगळा करू नये.

७) कच्चे काम करण्यासाठी प्रश्नपत्रिकेच्या शेवटच्या पानावर दिलेल्या कोऱ्या जागेचा वापर करावा.

८) परीक्षार्थीने प्रश्नपत्रिकेचा क्रमांक उत्तरपत्रिकेवर व उत्तरपत्रिकेचा क्रमांक प्रश्नपत्रिकेवर व दोन्ही क्रमांक स्वाक्षरीपटावर लिहिणे आवश्यक आहे.

९) परीक्षा प्रवेशपत्राची मागणी केल्यास पर्यवेक्षकास दाखवावे. प्रवेशपत्रात दुरुस्ती असल्यास ती करून / नसल्यास तसेच प्रवेशपत्र परीक्षेनंतर पर्यवेक्षकाकडे देऊन पोच घ्यावी व ही पोच पावती जपून ठेवावी.

१०) उत्तरपत्रिका देताना उत्तरपत्रिकेची Carbonless प्रत परीक्षार्थीने परीक्षा झाल्यानंतर परत घेऊन स्वाक्षरी पटावर दुसरी स्वाक्षरी करावी. दुसरी स्वाक्षरी नसल्यास त्याने उत्तरपत्रिका पर्यवेक्षकाकडे दिलेली नाही असे समजण्यात येईल.

११) पर्यवेक्षकाच्या सूचनेशिवाय परीक्षागृह सोडू नये.

१२) परीक्षार्थीने परीक्षा चालू असताना अथवा परीक्षा संपल्यानंतर परीक्षेसंबंधी कोणतेही साहित्य परीक्षागृहाबाहेर नेल्यास / नेल्याचे निदर्शनास आल्यास त्याची या परीक्षेतील उमेदवारी रद्द होईल. त्याचबरोबर त्यांचेविरुद्ध भारतीय दंडसंहिता (IPC) अंतर्गत कारवाई करण्यात येईल.

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

## भाग - A : इंग्रजी

1. Choose the correct alternative of verb :

*"When we reached the stadium, the players _______ already."*

(1) have gone (2) went (3) had gone (4) has gone

2. Identify the underlined clause in the sentence :

*"The patient was sure that he would recover."*

(1) Noun Clause (2) Adjective Clause

(3) Adverbial Clause of Reason (4) Adverbial Clause of Concession

3. Choose the correct spelt word :

(1) Sattellite (2) Sattelite (3) Satelite (4) Satellite

4. Choose the correct 'Figure of Speech' in the given line :

*"Exult, O shores, and ring O bells !"*

(1) Simile (2) Metaphor (3) Climax (4) Apostrophe

5. Choose the correct 'Synonym' of :

*'combat'*

(1) fight (2) quarrel (3) feud (4) conflict

6. Choose the correct 'Assertive Sentence' of the given sentence :

*"How can any burglar open the window ?"*

(1) No burglar couldn't open the window.

(2) The burglar can't open the window.

(3) The burglar can open the window.

(4) The window can't be open by the burglar.

7. Choose the correct 'Indirect Speech' of the given sentence :

*He said, "Why have you called here and disturbed me ?"*

(1) He asked why he has called there and disturbed him.

(2) He asked why had he called there and disturbed him.

(3) He asked why he had called there and disturbed him.

(4) He asked that why he had called there and disturbed him.

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

8. Select the correct 'neither ......... nor' answer of the given sentence :

*"Vijayant didn't pay attention to parents. He didn't learn from teachers."*

(1) Vijayant neither paid attention to parents nor learnt from teachers.

(2) Vijayant paid neither attention to parents nor learnt from teachers.

(3) Vijayant neither pay attention to parents nor learn from teachers.

(4) Vijayant neither pay attention to parents nor learnt from teachers.

9. Choose the correct 'so ........... that' sentence of the given sentence :

*"It was too difficult for Keshav to pay heed to the teacher."*

(1) It was so difficult that Keshav couldn't pay heed to the teacher.

(2) It was so difficult for Keshav that he couldn't pay heed to the teacher.

(3) It was so difficult for Keshav that he can't pay heed to the teacher.

(4) It was so difficult that Keshav could pay heed to the teacher.

10. Select the correct 'Question Tag' for given sentence :

*"Show me the way to the park."*

(1) don't you ? (2) will me ? (3) will I ? (4) will you ?

11. Choose the correct 'Passive Voice' of the sentence :

*"Where are you attending the meeting ?"*

(1) Where are the meeting being attended by you ?

(2) Where is the meeting being attended by you ?

(3) Where you are being attending the meeting ?

(4) Where the meeting is being attended by you ?

12. Choose the correct preposition :

*"Quinine is an effective antidote ______ Malaria."*

(1) to (2) against (3) for (4) in

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

**13.** Choose the correct 'Exclamatory Sentence' of the given sentence :

*"Mr. Sen was a great educationist."*

(1) What a great educationist Mr. Sen was !

(2) How a great educationist Mr. Sen was !

(3) What an educationist Mr. Sen was !

(4) What a great educationist was Mr. Sen !

**14.** Select the correct 'Opposite Word' of the given :

*'integral'*

(1) minor (2) major (3) independent (4) essential

**15.** Choose the correct alternative :

*"Mr. Kumar spoke in _______ low voice."*

(1) a (2) the (3) an (4) no article

**16.** Choose the correct 'Comparative Degree' of the given sentence :

*"The Shatabdi Express is the most comfortable train."*

(1) The Shatabdi Express is more comfortable than most other trains.

(2) The Shatabdi Express is more comfortable than many other train.

(3) The Shatabdi Express is much comfortable than any other trains.

(4) The Shatabdi Express is more comfortable than any other train.

**17.** Choose the correct 'used to' sentence of the given sentence :

*"Rushikesh would find a better job."*

(1) Rushikesh would used to find a better job.

(2) Rushikesh used to find a better job.

(3) Rushikesh would used to found a better job.

(4) Rushikesh will used to find a better job.

Prepp
Your Personal Exams Guide

**18.** Choose the correct 'No Sooner' sentence of the given sentence :

*"As soon as Srinath put step into the class, the children became silent."*

(1) No sooner do Srinath put step into the class than the children become silent.

(2) No sooner Srinath put step into the class than the children became silent.

(3) No sooner do Srinath put step into the class than the children became silent.

(4) No sooner did Srinath put step into the class than the children became silent.

**19.** Choose the correct 'Unless' sentence of the given sentence :

*"I shall not forgive him if he doesn't apologize to me."*

(1) I shall not forgive him unless he apologizes to me.

(2) I shall not forgive him unless he apologized to me.

(3) I shall forgive him unless he apologizes to me.

(4) Unless he doesn't apologize to me, I shall not forgive him.

**20.** Choose the correct 'Wh - Question' to get underlined part as answer :

*"We have received <u>your letters</u> this morning."*

(1) What have we received this morning ?

(2) What we have received this morning ?

(3) What have we receive this morning ?

(4) What we have receive this morning ?

**21.** Choose the correct 'Not only ........ but also' answer of the given sentence :

*"I washed my hands and ate my dinner too."*

(1) Not only I washed my hands but also ate my dinner.

(2) I not only washed my hands but also ate my dinner too.

(3) I washed not only my hands but also ate my dinner.

(4) I not only washed my hands but also ate my dinner.

www.prepp.in

22. Choose the correct 'Verbal Question' of the given sentence :

*"He gave witness at the sensational trial."*

(1) Did he gave witness at the sensational trial ?

(2) Does he give witness at the sensational trial ?

(3) Did he give witness at the sensational trial ?

(4) Did give he witness at the sensational trial ?

23. Choose the correct 'Passive Voice' of the given sentence :

*"The thieves had broken the back door."*

(1) The back door had broken by the thieves.

(2) The back door had been broken by the thieves.

(3) The back door had been broken by them.

(4) The back door has been broken by the thieves.

24. Choose the correct alternative :

*"Mr. Kedar becomes ______ S.P. of Pune District."*

(1) the (2) an (3) a (4) no article

25. Choose the correct 'Degree Sentence' from the given sentences :

(1) Dr. Ganesh is one of the most popular teachers on our class.

(2) Dr. Ganesh is one of the most popular teacher on our class.

(3) Dr. Ganesh is the most popular teachers on our class.

(4) Dr. Ganesh is more popular teachers on our class.

*Read the passage and choose the correct answers of the given : (Questions No. 26 to 30)*

Newspapers sell because of news and editorial coverage but it gets more revenue from advertisements. News costs money, while advertisements fetch money. The economics of modern newspapers is such that it can't run by just selling news, it has to depend on advertisements. The economics of newspaper publishing requires both subscribers who can afford to buy newspapers and businessmen who can afford to advertise in it. The growth of the press depends on both. Therefore, in newspaper management neither aspect can be neglected.

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Co-ordination among the various departments - editorial, circulation, advertising and production is very essential for effective and better management. The head of various departments must be part of the management of a newspaper. They must be aware of the goals set, policies and future plans of the management. They cannot afford to remain cut off from the main stream of management function. In addition, each department should keep the other department managers informed of those of its activities that will be useful to them. This is a vital aspect of newspapers management.

26. The growth of a newspaper depends on :

(1) subscribers and advertisers (2) advertisers

(3) large scale subscribers (4) the editorial and news coverage

27. The word 'Vital' as used in the context means :

(1) healthy (2) primary (3) lively (4) important

28. The main idea of the first paragraph of the passage is :

(1) The economics of newspaper publishing.

(2) The importance of advertisements.

(3) News and editorial coverage.

(4) The growth of the press.

29. The heads of departments must know about :

(1) goals and money (2) goals, policies and plans

(3) better management (4) the growth of press

30. The main idea of the second paragraph of the passage is :

(1) The future of newspapers. (2) How to sell newspapers ?

(3) Effective newspaper management (4) The role of the heads of departments.

## भाग - A : मराठी

*पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्न-क्रमांक 31 ते 34च्या प्रश्नांची उत्तरे पर्यायातून निवडा :*

फ्रेंच माणूस आपल्या स्वतःच्या भाषेवर बेहद प्रेम करतो. भाषा ही त्याची प्राणसखीच ! तो जगतो किंवा झुरतो ते तिच्यासाठी ! 'हिचे पुत्र आम्ही, हिचे पांग फेडू' असे तो केवळ कवितेत म्हणत नाही तर तिच्या संवर्धनासाठी आणि प्रसारासाठी तो मिशनरी वृत्तीने झटतो आणि प्रसंगी झगडतोही ! एखादा नवीन शब्द शब्दकोशात समाविष्ट करून घ्यायचा असेल, तर त्यासाठी सर्वोच्च फ्रेंच अकादमीची मान्यता मिळवावी लागते. सर्व प्रकारच्या अग्निपरीक्षांतून पार पडल्यानंतरच त्या शब्दाला शब्दकोशात मानाचं स्थान मिळतं.

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

भाषा हे संपर्काचं एक साधन आहे, तेव्हा भाषेच्या अभिमानानं माणसानं माथेफिरू होऊ नये हे खरं आहे, परंतु त्याचबरोबर भाषा ही समाजपुरुषाच्या जीवनाला चेतना देणाऱ्या रक्तासारखी आहे. ती दूषित होणार नाही, याकडेही लक्ष पुरविणं आवश्यक आहे.

फ्रेंचाप्रमाणे जर्मन लोकांनाही आपल्या भाषेविषयी प्रेम आहे. आपली भाषा इतरांनी शिकावी म्हणून त्यांनी जगभर केंद्रे काढली आहेत, परंतु त्याचबरोबर अन्य भाषांवरही त्यांचं प्रेम आहे. जर्मन पंडितांचं संस्कृत भाषेवरचं प्रेम सर्वज्ञात आहे. संस्कृतचा अभ्यास भारतापेक्षा जर्मनीत अधिक होत असावा.

**31.** भाषेला लेखकाने कोणती उपमा दिली आहे ?

(1) माथेफिरू माणसाची (2) समाजपुरुषाची

(3) समाजपुरुषाला चेतना देणाऱ्या रक्ताची (4) दूषित रक्ताची

**32.** भाषेच्या संवर्धनासाठी आणि प्रसारासाठी झटणारा माणूस लेखकाला कोणत्या देशात भेटला ?

(1) भारत (2) जर्मनी (3) इंग्लंड (4) फ्रान्स

**33.** जर्मन पंडितांचं अन्य कोणत्या भाषेवर प्रेम आहे ?

(1) जर्मनी (2) संस्कृत (3) फ्रेंच (4) इंग्रजी

**34.** आपली भाषा इतरांनी शिकावी म्हणून जगभर प्रसार करणारा देश कोणता ?

(1) जर्मनी (2) फ्रान्स (3) इंग्लंड (4) भारत

**35.** महानायक, संभाजी, पानिपत या कादंबऱ्यांचे लेखन कोणी केले आहे ?

(1) रणजित देसाई (2) विश्वास पाटील (3) शंकर पाटील (4) शिवाजी सावंत

**36.** "रोज कुठल्यातरी फॅक्टरीतला पाचचा भोंगा वाजत असे." या वाक्याचा काळ ओळखा :

(1) रिती वर्तमानकाळ (2) रिती भविष्यकाळ

(3) रिती भूतकाळ (4) अपूर्ण भूतकाळ

**37.** "आपला आशीर्वाद असावा." या वाक्याचा प्रकार कोणता ?

(1) संकेतार्थी (2) स्वार्थी (3) आज्ञार्थी (4) विध्यर्थी

**38.** 'विद्वान' हा शब्द खालीलपैकी कोणत्या प्रकारचा आहे ?

(1) देशी (2) परभाषीय (3) तत्सम (4) तद्भव

**39.** "सहलीस जाताना कात्रजजवळ उजाडले." या वाक्यातील प्रयोग ओळखा :

(1) भावकर्तरी (2) भावे (3) कर्मणी (4) कर्तरी

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

40. 'म - स - ज - स - त - त - ग' हे कोणत्या वृत्तांचे गण आहेत ?

(1) नववधू (2) भुजंग प्रयात (3) शार्दूलविक्रीडित (4) इंद्रवज्रा

41. पुढीलपैकी संधी विग्रहाच्या नियमानुसार गटात न बसणारा शब्द कोणता ?

(1) दुष्काळ (2) दुर्जन (3) निष्कारण (4) निष्फळ

42. नागनाथ कोलापल्ले यांच्या पुढीलपैकी कोणत्या साहित्यकृतीला राज्यशासनाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे ?

(1) मूड्स (2) राजधानी (3) गांधारीचे डोळे (4) जोतिपर्व

43. पुढीलपैकी अशुद्ध शब्द ओळखा :

(1) नाविन्य (2) प्रतिक्षागृह (3) परीक्षा (4) आध्यात्मिक

44. जयंताने मध्येच विचारले, 'कोण होते ?' या वाक्यात किती विरामचिन्हे आली आहेत ?

(1) 1 (2) 2 (3) 3 (4) 4

45. पुढील शब्दाचा समानार्थी नसलेला शब्द ओळखा :

*'अश्व'*

(1) वारु (2) हय (3) तुरंग (4) शाखामृग

पुढील पद्य वाचून प्रश्न-क्रमांक 46 ते 49ची उत्तरे पर्यायातून निवडा :

पीक खुशीत डोलतंया भारी,
भरला आनंद समदया शिवारी.
बगून पाचूचं रान,
आमचं हरपलं देहभान.
आज रानाची शोभा न्यारी....

आल्या सरसर भुईवर धारा,
ताप मातीचा सरला सारा.
समदं शिवार फुलून आलं,
बगून मन हे भुलून गेलं.
गेल्या भुलून दिशाही चारी.....

दाट पिकांनी सजली शेतं,
पीक मजेत गिरकी घेतं.
गार वारं हे झुळझुळ व्हातं,
पानापानांत गाणी गातं.
गाती पानात पाकरं ही सारी....

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

काळ्या आईची कराया पूजा,
राबराबला शेतकरी राजा.
ऊनातानात घाम त्यानं शिपला,
मळा मोत्यांचा मातीत पिकला.
आली सोन्याची दौलत दारी.....

46. शेतकरी काळ्या आईची पूजा करतो म्हणजे काय करतो ?
(1) शेतात कष्ट करतो.
(2) काळ्या आईची ओटी भरतो.
(3) रानात पूजा करतो.
(4) शेतीला आई मानतो.

47. शेतातील पिके पाहून कोणाचे देहभान हरपते ?
(1) निसर्गाचे
(2) पावसाचे
(3) शेतकऱ्याचे
(4) वाऱ्याचे

48. कवितेतील 'मोत्यांचा मळा' या शब्दाचा समर्पक अर्थ काय ?
(1) पाखरे
(2) झरा
(3) शेतातील पीक
(4) संपत्ती

49. कवितेत कोणत्या अनमोल हरित रंगदर्शक रत्नाचे नाव आले आहे ?
(1) पाचू
(2) मोती
(3) सोने
(4) माणिक

50. 'जहाल' या शब्दाचा योग्य विरुद्धार्थी शब्द शोधा :
(1) उग्र
(2) तिखट
(3) मवाळ
(4) जलाल

51. पुढील म्हण पूर्ण करा - 'पदरी पडले झोंड, ________'
(1) हासून केले गोड
(2) रडून केले खोंड
(3) हसत झेलली धोंड
(4) मारुन केले गोड

52. ज्या सामासिक शब्दात दोन्ही पदे महत्त्वाची नसून त्यातून तिसऱ्याच पदाचा बोध होतो, असा समास कोणता ?
(1) अव्ययीभाव
(2) बहुव्रीही
(3) द्वंद्व
(4) तत्पुरुष

53. पुढीलपैकी भाववाचक नसलेले नाम शोधा :
(1) भव्यता
(2) सौंदर्य
(3) दातृत्व
(4) स्वतंत्र

54. साधर्म्यावर आधारित आणि वैधर्म्यावर आधारित असे भेद कोणत्या अलंकारात पडतात ?
(1) दृष्टान्त
(2) स्वभावोक्ती
(3) अनन्वय
(4) चेतनागुणोक्ती

55. पुढीलपैकी निश्चितपणे पुरुषवाचक शब्द ओळखा :
(1) क्लास
(2) कंपनी
(3) ट्रंक
(4) पेन्सिल

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

56. पुढीलपैकी निश्चितपणे एकवचनी शब्द ओळखा :

(1) घरे (2) लिंबे (3) फोटो (4) पिले

57. पुढील वाक्यातील नाम कोणत्या विभक्तीत आहे ?

*"मुलांनी आज्ञा पाळावी."*

(1) चतुर्थी अनेकवचनी (2) द्वितीया अनेकवचनी

(3) षष्ठी अनेकवचनी (4) तृतीया अनेकवचनी

58. नोकरीसाठी केलेला अर्ज हा कोणत्या पत्रलेखनाचा प्रकार आहे ?

(1) तक्रार अर्ज (2) मागणी अर्ज (3) कौटुंबिक पत्र (4) व्यावसायिक पत्र

59. पुढीलपैकी कठोर व्यंजन कोणते ?

(1) च् (2) ग् (3) ड् (4) द्

60. पुढील वाक्यात किती नामांमध्ये सामान्यरुपामुळे बदल झाला आहे ?

*शिक्षकांनी मुलांना शाबासकी दिली.*

(1) एक (2) दोन (3) तीन (4) चार

## भाग - B : बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र

61. 'मानवी वर्तनाचे शास्त्र ते मानसशास्त्र' अशी व्याख्या ______ यांनी केली.

(1) वॉटसन (2) थॉर्नडाईक (3) विल्हेम वुंट (4) मॅकड्यूगल

62. एखाद्या मोठ्या समूहाचे वर्तन काही प्रसंगात कसे घडेल, याच्या अंदाजासाठी ______ पद्धती अत्यंत उपयुक्त असते.

(1) आत्मनिरीक्षण (2) सर्वेक्षण (3) प्रायोगिक (4) जीवनवृत्तांत

63. कातड्याच्या निर्जीव पट्ट्याला अंधारात साप समजून आपण घाबरतो हे ______ चे उदाहरण आहे.

(1) समावेश (2) मनाचा कल (3) इंद्रियभ्रम (4) चित्तभ्रम

64. सामाजिक निरीक्षणात्मक अध्ययन उपपत्ती ______ यांनी मांडली.

(1) जेरोम ब्रूनर (2) डेव्हीड असुबेल (3) डॉ. ब्लूम (4) अल्बर्ट बांदुरा

65. साधक अभिसंधान पद्धतीचा उद्गाता ______ होय.

(1) अल्बर्ट बांदुरा (2) बी. एफ. स्किनर (3) डॉ. ब्लूम (4) थॉर्नडाईक

66. कवि, लेखक, कलाकार, चित्रपट यांतील कल्पना ______ प्रकारच्या असतात.

(1) अनुकरणात्मक (2) सृजनात्मक (3) व्यावहारिक (4) पुनरुत्पादित

67. अध्ययनविषयक क्षेत्रीय उपपत्ती ______ या मानसशास्त्रज्ञाने मांडली.

(1) कुर्ट लेवीन (2) स्किनर (3) अल्बर्ट बांदुरा (4) कोहलर

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

68. अध्ययन संक्रमणाची सामान्यीकरणाची उपपत्ती यांनी मांडली.

(1) जडड्  (2) थॉर्नडाईक  (3) हीले  (4) बॅग्ले

69. व्यक्ती व तिच्या भोवतालचे वातावरण यांच्यातील आंतरक्रियातून प्राप्त झालेल्या मर्मदृष्टीद्वारे समस्या सोडविल्या जातात असे ______ यांचे मत आहे.

(1) असुबेल  (2) लेवीन  (3) पॅवलॉव्ह  (4) कोहलर

70. कोणतीही गोष्ट जाणून घेण्यासाठी मनाने केलेली धडपड म्हणजे ______ होय.

(1) विस्मरण  (2) स्मरण  (3) अवधान  (4) कल्पना

71. 'प्रतिक्रियांमधील जोश किंवा आवेश वाढविणारी स्थिती म्हणजे प्रेरणा' असे ______ यांनी म्हटले आहे.

(1) जूश्री  (2) कोम्बज  (3) रिनग  (4) लिंडस्ले

72. सायकलवर तोल सांभाळता आला की, स्कूटर किंवा मोटारसायकल शिकण्यास त्याचा उपयोग होतो हे ______ या संक्रमणाचे उदाहरण आहे.

(1) धन  (2) ऋण  (3) शून्य  (4) यापैकी नाही

73. विकास अवस्थेतील वयोगट 6-12 वर्षे या कालावधीला ______ असे म्हणतात.

(1) शैशवावस्था  (2) किशोरावस्था  (3) कुमारावस्था  (4) पौगंडावस्था

74. स्मृती म्हणजे नवा अनुभव असे ______ यांनी म्हटले आहे.

(1) स्टाऊट  (2) रॉस  (3) एबिंगहॉस  (4) मन

75. चित्रकार चित्र रेखाटण्यात इतका रंगून जातो की त्याला स्थळकाळाचे भान राहत नाही हे ______ अवधानाचे उदाहरण होय.

(1) अभ्यस्त  (2) ऐच्छिक

(3) अनैच्छिक  (4) वरीलपैकी कोणतेही नाही

76. बाह्य उद्दिपकासंबंधी मज्जातंतूमार्फत मेंदूकडे पोहचविल्या जाणाऱ्या प्राथमिक स्वरूपाच्या मानसिक क्रियेला ______ म्हणतात.

(1) अवबोध  (2) प्रतिमा  (3) संवेदना  (4) कल्पना

77. 'बुद्धिमत्ता म्हणजे बदलत्या परिस्थितीत नव्या गरजा भागविण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे विचार करण्याची शक्ती' असे ______ यांनी म्हटले आहे.

(1) स्टर्न  (2) मॅकड्यूगल  (3) गेटस्  (4) विल्यम जेम्स

78. आकलन, शोध, दिशा व टिका हे बुद्धिचे चार पैलू आहेत असे ______ यांनी मांडले.

(1) विल्यम स्टर्न  (2) टर्मन  (3) थॉर्नडाईक  (4) अल्फ्रेड बिने

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

79. शैक्षणिक बुद्धिमत्तेला भावनिक बुद्धिमत्तेचे सहाय्य असले पाहिजे असा विचार ______ यांनी मांडला.

(1) स्पिअरमन (2) थर्स्टन (3) गिलफोर्ड (4) डॅनियल गोलमन

80. साध्य गाठण्यास प्रवृत्त करणाऱ्या, विशिष्ट दिशेने वाटचाल करावयास लावणाऱ्या आणि वर्तनासाठी उत्साह टिकवून धरणाऱ्या शक्तींचे मिश्रण म्हणजे ______ होय.

(1) भावना (2) धारणा (3) प्रेरणा (4) बुद्धिमत्ता

81. अध्यापन हे अध्ययनांगी होण्यासाठी काय आवश्यक आहे ?

(1) प्रवर्तन (2) बक्षीस (3) शिक्षा (4) साहित्य

82. इसवीसन 1921 साली दक्षिणामूर्ती येथे 'बालमंदिर' नावाची शिशुशाळा ______ यांनी सुरु केली.

(1) अनुताई वाघ (2) सावित्रीबाई फूले (3) रमाबाई रानडे (4) गिजूभाई बधेका

83. अध्यापनाच्या प्रतिमानाचे जनक ______ हे आहेत.

(1) हर्बर्ट थेलन व जॉन ड्युई
(2) फॅनी शॅफेल व जार्ज शॅफेल
(3) मार्शा वील व ब्रूस जॉईस
(4) जार्ज ब्राऊन व विल्यम शू

84. सजीवांची लक्षणे हा पाठ शिकविताना शिक्षकांनी सुरुवातीला विद्यार्थ्यांकडून सभोवताली असणाऱ्या सजीवांची माहिती काढून घेतली. येथे शिक्षकांनी अध्यापनाचे कोणते सूत्र वापरले ?

(1) मूर्ताकडून अमूर्ताकडे
(2) ज्ञाताकडून अज्ञाताकडे
(3) सुगमाकडून संकीर्णाकडे
(4) विशिष्टाकडून सामान्याकडे

85. यशस्वी अध्यापन म्हणजे काय ?

(1) 100% निकाल
(2) सर्व विद्यार्थ्यांनी प्राविण्यासह उत्तीर्ण होणे
(3) परिणामकारक अध्ययन
(4) विद्यार्थ्यांचे यश

86. क्रियात्मक क्षेत्रातील विकासाच्या टप्प्यांचा योग्य क्रम कोणता ?

(1) स्वाभाविकीकरण - अचूकता - संधीकरण - अनुकरण - क्रियाकौशल्य
(2) अनुकरण - स्वाभाविकीकरण - क्रियाकौशल्य - अचूकता - संधीकरण
(3) अनुकरण - क्रियाकौशल्य - संधीकरण - अचूकता - स्वाभाविकीकरण
(4) अनुकरण - क्रियाकौशल्य - अचूकता - संधीकरण - स्वाभाविकीकरण

87. खाली काही वर्तनबदल दिले आहेत. त्यापैकी बोधात्मक वर्तनबदल कोणता आहे तो ओळखा :

(1) शारदा सुंदर भरतकाम करते.
(2) राजूचे त्याच्या कुत्र्यावर प्रेम आहे.
(3) विनित परिच्छेद वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे सोडवितो.
(4) सुनिताला शंख शिंपले जमविण्याचा छंद आहे.

Prepp
Your Personal Exams Guide

**88.** खालीलपैकी कोणती मूले विशेष शिक्षणाची गरजा असणारी नाहीत ते सांगा :

(1) बौद्धिकदृष्ट्या मागासलेली (2) उच्च दर्जाची बुद्धिमत्ता असलेली

(3) अध्ययन अक्षमता असलेली (4) अध्ययन क्षमता असलेली

**89.** अध्ययनात क्रियाशीलता कोणत्या स्वरूपाची असते ?

(1) बौद्धिक व भावनिक (2) शारीरिक व मानसिक

(3) फक्त बौद्धिक (4) फक्त सामाजिक

**90.** अध्यापनशास्त्र म्हणजे :

(1) पद्धती व प्रतिमान (2) तत्त्वे व नियम

(3) अध्यापन सूत्रे (4) वरील सर्व

## भाग - C : गणित

**91.** $\frac{11}{14}, \frac{13}{18}, \frac{27}{31}, \frac{19}{24}, \frac{17}{19}$ या संख्या चढत्या क्रमाने लावल्यास पहिली संख्या कोणती ?

(1) $\frac{11}{14}$ (2) $\frac{19}{24}$ (3) $\frac{13}{18}$ (4) $\frac{27}{31}$

**92.** 4, 8, 9, 2 यातील प्रत्येक अंक एकेकदाच वापरून तयार होणाऱ्या चार अंकी जास्तीत जास्त संख्या किती ?

(1) 6 (2) 12 (3) 18 (4) 24

**93.** सर्वात लहान विषम संयुक्त संख्या आणि दोन अंकी सर्वात मोठी मूळ संख्या यांची बेरीज किती ?

(1) 100 (2) 106 (3) 99 (4) 104

**94.** (0.9 कि.ग्रॅम) - [(3.5 हेक्टोग्रॅम) + (22.5 डेकाग्रॅम)] + (9.25 हेक्टोग्रॅम) = किती ?


(1) 2.5 कि.ग्रॅम (2) 1250 ग्रॅम (3) 2500 ग्रॅम (4) 12.5 ग्रॅम

**95.** एका घड्याळात 8 : 20 आणि 9 : 08 या दोन्ही वेळी मिनिटकाटा आणि तासकाटा यात होणाऱ्या कोनांचा मापांतील फरक किती ?


(1) $4^\circ$ (2) $8^\circ$ (3) $12^\circ$ (4) $16^\circ$

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

**96.** 

[A]



[B]

वरील आकृती [B] मधील आयताची 'लांबी-रुंदी' अनुक्रमे आकृती [A] मधील आयताच्या 'लांबी-रुंदी'च्या दुप्पट आणि दीडपट आहे. जर [A] मधील आयताची लांबी 20 सेमी. आणि रुंदी 10 सेमी. असेल, तर दोन्ही आयतांमधील रेखांकित भागांच्या क्षेत्रफळातील फरक किती ?

(1) 200 सेमी$^2$  (2) 400 सेमी$^2$  (3) 100 सेमी$^2$  (4) 300 सेमी$^2$

**97.** $\left[0.8 + \frac{16}{15}\right] + \left[\frac{0}{5} + \frac{5}{8}\right]$ = किती ?

(1) $\frac{4}{5}$  (2) 0.75  (3) 0.8  (4) $1\frac{2}{5}$

**98.** 500मी. लांबीची आगगाडी ताशी 60 किलोमीटर वेगाने धावते, तर तिला 700 मीटर लांबीचा पूल ओलांडण्यास किती वेळ लागेल ?

(1) 60 सेकंद  (2) 36 सेकंद  (3) 72 सेकंद  (4) 30 सेकंद

**99.** 43 * * 6 या संख्येस 12 ने नि:शेष भाग जातो. जर '*' च्या जागी समान अंक असेल, तर '*' = किती ?

(1) 5  (2) 4  (3) 7  (4) 3

**100.** 2011 साली गांधी जयंती रविवारी होती, तर त्याच वर्षातील प्रजासत्ताक दिनाचा वार कोणता ?

(1) रविवार  (2) गुरुवार  (3) बुधवार  (4) मंगळवार


**101.** एका आयताकृती बागेला 5 वेढे असलेले तारेचे कुंपण करण्यासाठी प्रति मी. 10 रु. याप्रमाणे 17,000 रुपये खर्च आला. जर बागेची रुंदी 50 मी. असेल, तर बागेच्या समोरासमोरील दोन टोकातील अंतर किती ?

(1) 100 मी.  (2) 120 मी.  (3) 130 मी.  (4) 140 मी.

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

**102.** शेजारील आकृतीतील रेख EG ही वर्तुळाची सर्वात मोठी जीवा असून □ EFGH ची परिमिती 196 सेमी. आहे. तसेच रेख (FG) ≅ रेख (GH), $l$(FG) = 56 सेमी. यावरून वर्तुळाचा परीघ किती ?




(1) 110 सेमी. (2) 220 सेमी. (3) 168 सेमी. (4) 235 सेमी.

**103.** $\left[\frac{(L) \times (M)}{C} + V\right]$ = किती ?

(1) M (2) L (3) C (4) D

**104.** $\frac{x}{15}$ ही एक विषम संख्या आहे. या संख्येनंतर क्रमाने येणारी तेरावी सम संख्या कोणती ?

(1) $\left[\frac{x + 375}{15}\right]$ (2) $\left[\frac{x + 400}{15}\right]$ (3) $\left[\frac{x + 390}{15}\right]$ (4) $\left[\frac{x + 360}{15}\right]$

**105.** 27.487 या संख्येतील उजवीकडील '7'ची स्थानिक किंमत डावीकडील '7'च्या स्थानिक किमतीच्या किती पट नसेल ?

(1) $10^{-3}$ (2) 0.001 (3) $\frac{1}{1000}$ (4) $\frac{1}{10^{-3}}$

**106.** 'A' किंवा 'B' तुकडीतील विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे पुस्तके वाटली, तेव्हा 10 पुस्तके उरतात. जर पुस्तकांची एकूण संख्या 850 असेल आणि दोन्ही तुकड्यातील विद्यार्थ्यांची संख्या दोन क्रमवार समसंख्या असतील, तर विद्यार्थ्यांची एकूण संख्या किती ?

(1) 90 (2) 82 (3) 78 (4) 86

**107.** मुलाचे वय वडीलांच्या वयाच्या $\frac{3}{7}$ पट आहे. जर दोघांच्या वयातील फरक 40 वर्षे असेल, तर आणखी दहा वर्षांनी मुलाचे वय वडीलांच्या वयाच्या किती पट असेल ?

(1) $\frac{3}{7}$ (2) $\frac{1}{3}$ (3) $\frac{1}{2}$ (4) $\frac{2}{3}$

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

108. एक वस्तू विकल्याने विक्रेत्याला 4% तोटा होतो. जर त्या वस्तुची विक्री किंमत 550 रुपयांनी वाढविली असती, तर 6% नफा झाला असता, यावरून त्या वस्तुची मूळ किंमत किती ?

(1) रु. 2,750 (2) रु. 5,500 (3) रु. 7,750 (4) रु. 6,000

109. शामजवळ रु. 500, रु. 20, रु. 50, रु. 1000 आणि रु. 100 किमतीच्या समान संख्येत नोटा असून एकूण रक्कम 78,490 रुपये आहे. जर त्याने रु. 50 आणि रु. 500 किमतीच्या नोटा बँकेत भरल्या, तर त्याच्याजवळ किती रक्कम शिल्लक राहील ?

(1) रु. 53,000 (2) रु. 52,640 (3) रु. 29,140 (4) रु. 25,850

110. खाली त्रिकोणाच्या बाजूंच्या मापांचे संच दिले आहेत. त्यापैकी कोणत्या संचाने त्रिकोणरचना करता येणार नाही ?

(1) (60, 80, 100) (2) (0.7, 2.5, 2.4) (3) (50, 90, 30) (4) (1.7, 1.5, 0.8)


111. 27 मी$^3$ घनफल असणाऱ्या भरीव लाकडी घनापासून 1 सेमी. बाजू असलेले घन कापून वेगवेगळ्या जोडणीने नवीन तयार केलेल्या भरीव इष्टिकाचितींचे पृष्ठफळ खालीलपैकी किती असू शकेल ?

(अ) 78 मी$^2$ (ब) 110 मी$^2$ (क) 54 मी$^2$

(1) फक्त 'अ' (2) फक्त 'ब'

(3) फक्त 'अ' आणि 'ब' (4) तिन्ही 'अ', 'ब' आणि 'क'

112.




वरील आकृतीत रेषा x|| रेषा y आणि रेषा m|| रेषा *l* आहेत, तर आकृतीत दिलेल्या माहितीवरून m ∠a = किती ?

(1) 50° (2) 65° (3) 80° (4) 130°

113. 12.5 किमी लांबीच्या रस्त्यावर समान अंतरावर दुतर्फा फलक लावलेत. जर फलकांची एकूण संख्या 502 असेल, तर एकाच बाजूच्या दोन लगतच्या फलकातील अंतर किती ?

(1) 50 मी. (2) 25 मी. (3) 50.5 मी. (4) 25.25 मी.

114. सविताने सोमवारी 2.15 तास आणि मंगळवारी 1.50 तास असा एकाआड एक एकूण पाच दिवस अभ्यास केला, तर तिचा अभ्यासाचा एकूण कालावधी किती ?


(1) 9 तास 45 मिनिटे (2) 585 मिनिटे

(3) 9 तास 20 मिनिटे (4) 567 मिनिटे

www.prepp.in

Your Personal Exams Guide

**115.** शेजारील आकृतीतील त्रिकोणांची संख्या किती ?



(1) 4 (2) 7 (3) 5 (4) 6

**116.** $\dfrac{[1.6 \times 1.6] - [0.8\,(1.6 - 0.8)]}{[(0.8 - 1.6) + (2 - 0.4)]\,[(1.6 - 0.8) + (2 - 0.4)]}$ = किती ?

(1) 0 (2) 0.8 (3) 1 (4) 1.6


**117.** एक बाक आणि एक स्टूल यांची एकूण किंमत रु. 1,525 आहे. बाकापेक्षा स्टूल 425 रुपयाने स्वस्त आहे, तर दोन बाकांची किंमत किती ?

(1) रु. 975 (2) रु. 850 (3) रु. 425 (4) रु. 1,950

**118.** (2 * * 4) × (1 * 8) या क्रियेचे उत्तर खालील पर्यायांपेकी काय असू शकेल ?

(1) 346536 (2) 216432 (3) 589436 (4) 24942

**119.**




सूचना : आलेखाचे निरीक्षण करून प्रश्नाचे उत्तर लिहा :

शिरूड गावातील एकूण साक्षर व्यक्ती विंचूर गावातील एकूण साक्षर व्यक्तींच्या किती पट आहेत ?

(1) $\frac{3}{4}$ (2) $1\frac{1}{3}$ (3) $1\frac{1}{6}$ (4) $\frac{6}{7}$

Prepp
Your Personal Exams Guide

120. गणित अध्यापन पद्धती संबंधी खालीलपैकी योग्य विधाने किती ?

विधाने :

(अ) विषयविस्तार व संकलन या पायऱ्यांवर उद्‌गामी पद्धती वापरतात.

(ब) उद्‌गामी व अवगामी पद्धती एकमेंकीस पूरक आहेत.

(क) उपयोजन पातळीवर अवगामी पद्धती वापरतात.

(ड) उद्‌गामी व अवगामी पद्धती विरुद्ध पद्धती नाहीत.

(1) दोन (2) चार (3) एक (4) तीन

## भाग - D : परिसर अभ्यास

121. 'जीभ लाल होणे, त्वचा खरखरीत होणे' या सारख्या विकारांवर उपचार म्हणून रुग्णाच्या आहारात कशाचा समावेश करण्याचा सल्ला डॉक्टर देतील ?

(1) आवळा, लिंबू, संत्रे, मोड आलेली कडधान्ये

(2) दूध, शार्क लिव्हर ऑइल, कॉड लिव्हर ऑइल

(3) डाळी, पालेभाज्या, दूध

(4) पालेभाज्या, पिवळी पिकलेली फळे, गाजर, पपई, दूध

122. खालील पर्यायातील प्राण्यांचा सर्वसाधारण आयुर्मानाप्रमाणे उतरता क्रम लावल्यास सुरुवातीपासूनचा दुसरा प्राणी कोणता ?

(1) शहामृग (2) घरमाशी (3) कुत्रा (4) हत्ती

123. सोनकीडे कशासाठी उपयोगी पडतात ?

(1) रेशीम संवर्धन (2) कीटक संवर्धन

(3) मधमाशांच्या पोळ्यांचे संवर्धन (4) कीटकनियंत्रण

124. मानवाचे किती दात पडून पुन्हा नव्याने दात येतात ?

(1) 14 (2) 20 (3) 28 (4) 32

125. पितळेची भांडी कोणत्या धातूंच्या मिश्रणापासून तयार करतात ?

(1) जस्त - तांबे (2) तांबे - लोखंड (3) निकेल - जस्त (4) लोखंड - निकेल

126. खालील पर्यायांपैकी योग्य विधान कोणते ?

(1) सर्वच जीवाणू उपद्रवी असतात.

(2) सर्वच जीवाणू उपकारक असतात.

(3) काही जीवाणू उपद्रवी, तर काही उपकारक असतात.

(4) जीवाणू व विषाणू समान आकाराचे असतात.

www.prepp.in

127. स्टेनलेस स्टीलला कोणत्या पदार्थामुळे चकाकी येते ?

(1) निकेल (2) कथील (3) जस्त (4) ग्रॅफाइट

128. अणूमधील इलेक्ट्रॉनचे वस्तुमान प्रोटॉन्स व न्युट्रॉन्सच्या वस्तुमानाच्या तुलनेत कसे असते ?

(1) निमपट असते (2) फारच कमी असते

(3) समान असते (4) जास्त असते

129. खालील पर्यायांपैकी 'निसर्गातील सफाई कामगार' कोण आहे ?

(1) साप (2) वटवाघूळ (3) वाळवी (4) धार

130. ॲल्युमिनिअमच्या अणूमध्ये 13 प्रोटॉन, 14 न्युट्रॉन व 13 इलेक्ट्रॉन असतील, तर ॲल्युमिनिअमचा अणूवस्तुमानांक किती असले ?

(1) 26 (2) 13 (3) 27 (4) 40

131. सौरघटाचा वापर करून खालीलपैकी कोणकोणत्या ठिकाणी वीजपुरवठा करता येईल ?

(अ) अवकाशातील मानवनिर्मित उपग्रह (ब) औषध साठवण्याचे शीतकपाट

(क) वीजतापक (ड) स्वयंपाक करणे

(इ) दुर्गम प्रदेशातील पाणी उपसणारे पंप

(1) फक्त अ, ब आणि क (2) फक्त अ, ब, क आणि ड

(3) फक्त ब, क, ड आणि इ (4) सर्व अ, ब, क, ड आणि इ

132. 'जागतिक आरोग्य दिन' कोणत्या दिवशी साजरा केला जातो ?

(1) 22 एप्रिल (2) 28 फेब्रुवारी (3) 10 जून (4) 7 एप्रिल

133. 'राज्य विज्ञान शिक्षण संस्था' कोठे आहे ?

(1) पुणे (2) नागपूर (3) मुंबई (4) औरंगाबाद

134. खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

(1) परिसंस्थेतील परपोषी सजीव हे उत्पादक असतात.

(2) परिसंस्थेतील भक्षक हे द्वितीय पोषण पातळीवर आहेत.

(3) मांसाहारी सजीव हे द्वितीय भक्षक आहेत.

(4) शाकाहारी सजीव हे परिसंस्थेत सर्वोच्च पातळीवर असतात.

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

135. समकेंद्री पद्धतीने विज्ञान पाठ्यक्रमात खालील पर्यायांपैकी प्रथम कोणता घटक येईल ?

(1) स्थायू पदार्थांचा अभ्यास
(2) पदार्थाचे विशिष्ट गुणधर्म
(3) पदार्थाचे गुणधर्म
(4) पदार्थाच्या अवस्था - स्थायू, द्रव, वायू

136. खालील पर्यायांपैकी समाजसुधारक आणि त्यांनी स्थापन केलेल्या संस्था यांची अयोग्य जोडी कोणती ?

(1) राजा राममोहन रॉय - ब्राम्हो समाज
(2) पं. इश्वरचंद्र विद्यासागर - आर्य समाज
(3) पंडिता रमाबाई - शारदा सदन
(4) आत्माराम पांडुरंग तर्खडकर - प्रार्थना समाज

137. 'प्रतियोगी सहकारिता' हे तत्त्व जाहीर करणारे खालील पर्यायांपैकी कोण ?

(1) महात्मा गांधी
(2) पंडित जवाहरलाल नेहरू
(3) लोकमान्य टिळक
(4) दादाभाई नौरोजी

138. मुरुंबदेवचा किल्ला आणि खेळणा किल्ला यांची छत्रपती शिवरायांनी अनुक्रमे कोणती नावे नव्याने दिली ?

(1) राजगड, विशाळगड
(2) विशाळगड, राजगड
(3) रायगड, प्रतापगड
(4) प्रतापगड, रायगड

139. खालील पर्यायातील शिवरायांच्या अष्टप्रधान मंडळातील मंत्रीपद आणि त्यांची कामे यांची योग्य जोडी कोणती ?

(1) पंडितराव - पत्रव्यवहार सांभाळणे
(2) सचिव - आज्ञापत्रे तयार करणे
(3) अमात्य - परराज्यांशी संबंध ठेवणे
(4) सुमंत - जमाखर्च पाहणे

140. मानवी उत्क्रांतीतील ताठ कण्याचा माणूस खालील पर्यायांपैकी कोणता ?

(1) एप
(2) होमो सेपियन
(3) चिपांझी
(4) होमो इरेक्टस

141. पृथ्वीवर सूर्य पूर्वेला उगवतो व पश्चिमेला मावळतो. कारण :

(1) पृथ्वी स्वत:भोवती पूर्वेकडून पश्चिमेकडे फिरते.
(2) पृथ्वी स्वत:भोवती पश्चिमेकडून पूर्वेकडून फिरते.
(3) पृथ्वी स्वत:भोवती फिरतांना सूर्याभोवती फिरते.
(4) सूर्याचे भासमान भ्रमण

142. खालील पर्यायांपैकी कोणते गोड्या पाण्याचे सरोवर नाही ?

(1) कोलेरू
(2) सांबर
(3) क्यानत्सो
(4) वुलर

143. खालील पदातील समान संबंध ओळखून प्रश्न सोडवा :

रायगड : अलिबाग : : ? : वांद्रे (पू.)

(1) ठाणे
(2) मुंबई शहर
(3) मुंबई उपनगर
(4) ठाणे उपनगर

www.prepp.in

144. खालीलपैकी अयोग्य विधान कोणते ?

(1) हिम व बर्फ यात फरक असतो.

(2) हिम व बर्फ यांचे गुणधर्म समान असतात.

(3) हिम अपारदर्शक तर बर्फ पारदर्शक असते.

(4) अतिउंच ठिकाणी हिमवृष्टी होते.

145. आसाम या घटकराज्याची सीमा एकूण किती राज्यांना संलग्न आहे ?

(1) सात (2) आठ (3) नऊ (4) सहा

146. राष्ट्रपती हे _______ नसतात.

(1) केंद्रशासनाचे कार्यकारी प्रमुख (2) देशाचे प्रथम नागरिक

(3) देशाचे वास्तव प्रमुख (4) देशाचे घटनात्मक प्रमुख

147. राज्यघटनेनुसार 'शिक्षण' हा विषय कोणत्या सूचित समाविष्ट आहे ?

(1) केंद्रसूची (2) राज्यसूची (3) समवर्ती सूची (4) विशेष सूची

148. खालील पर्यायातील गटात न बसणारा पर्याय कोणता ?

(1) जागतिक आरोग्य परिषद (WHO)

(2) जागतिक व्यापार संघटना (WTO)

(3) अन्नधान्य व कृषी परिषद (FAO)

(4) संयुक्त राष्ट्राची शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक परिषद (UNESCO)

149. इतिहास विषयाच्या त्रिमितीय संरचनेबाबत खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

(अ) प्राचीन, अर्वाचीन व मध्ययुगीन भाग पाडल्यास त्यास स्थळानुसार संरचना म्हणतात.

(ब) राजकीय, सामाजिक व आर्थिक भाग पाडल्यास त्यास विषयानुसार संरचना म्हणतात.

(1) फक्त अ (2) फक्त ब (3) अ आणि ब (4) कोणतेच नाही

150. खालीलपैकी परिसरीय घटकांबद्दल कोणते विधान बरोबर आहे ?

(1) पाऊस, वादळ, भूकंप हे भौतिक घटक आहेत.

(2) पर्वत, नदी, समुद्र हे भौगोलिक घटक आहेत.

(3) गाव, शहरे हे सामाजिक घटक आहेत.

(4) निवडणूका या सांस्कृतिक घटक आहेत.